'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue - 264 : India's Sustainable Development Goal in 21st Century
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April-2021

# समाजाचा शाश्वत विकास आणि साहित्य : एक आकलन

**प्रा. डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर**
महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक
मो. 7020471205

साहित्याची निर्मिती समाजाचा एक घटक असलेला साहित्यिक करत असतो. त्याने निर्माण केलेली साहित्यकृती वाचक वाचत असतो. वाचक हाही समाजाचाच घटक असतो. त्या साहित्यकृतीचा आस्वाद घेऊन साहित्यिकाचे कौतुकही समाजच करत असतो. त्यामुळे साहित्य ही समाजातून अनुभव घेऊन समाजाचा एक घटक असलेल्या साहित्यिकाने समाजासाठी निर्माण झालेली एक कला आहे. साहित्य ही चित्रकला, शिल्पकला, गायन कला इत्यादी कलांप्रमाणे एक कला असून भाषा हे तिचे मध्यम असते. ही भाषासुद्धा एक सामाजिक संस्था असून लेखकाची जडणघडण ज्या समाजातून होत असते त्या समाजाकडूनच त्याने ती घेतलेली असते. थोडक्यात साहित्य म्हणजे समाजातून अनुभवविश्व घेऊन त्याची आपल्या प्रतिभा शक्तीने कल्पनाशक्तीच्या आधारे भावनात्मकता, संवेदनशीलता, सूचकता इत्यादी वैशिष्ट्यांचे सेंद्रिय मिश्रण असलेली आणि समाजातील वाचकांना आस्वाद घेण्यासाठी किंवा आत्मविष्कारासाठी साहित्यिकाने साधलेली कलात्मक निर्मिती असते. अशा प्रकारचा संबंध साहित्य आणि समाज यांच्यामध्ये असतो. साहित्य ही एक शब्द कला असल्यामुळे शब्दांच्या म्हणजेच भाषेच्या माध्यमातून रसिकांना सौंदर्यस्थळांचे दर्शन घडवून आनंद प्राप्त करून देण्याचे काम साहित्य करत असते. त्यामुळे समाजाच्या जडणघडणीत आणि विकासात साहित्य महत्त्वाची भूमिका बजावत असते. पंचतंत्राच्या कथांच्या निर्मितीची आख्यायिका याचे एक उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.

साहित्यनिर्मितीची आणि वाचनाची प्रयोजने विचारात घेतली तर साहित्य आणि समाज यांचा संबंध अधिक स्पष्ट होईल. भारतीय साहित्य मीमांसकांपैकी मम्मट या मीमांसकाने 'काव्यप्रकाश' या ग्रंथातील पुढील श्लोकात साहित्याची सहा प्रयोजने सांगितलेली आहेत.

"काव्यं यशसेऽर्थ कृते, व्यवहारविदे शिवेतर क्षयते ।
सद्य: परिनिवृतये, कान्तासम्मित तयोपदेशयुजे ॥"

या श्लोकात त्याने यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण, पत्नीप्रमाणे प्रेमयुक्त उपदेश आणि उच्चतर आनंद अशी सहा प्रयोजने सांगितली आहेत. याबरोबरच इतरही अभ्यासकांनी साहित्याची विविध प्रयोजने सांगितलेली आहेत. त्यात प्रामुख्याने आत्माविष्कार, स्वप्ररंजन, भावनांचे विरेचन, जीज्ञासातृप्ती, उदबोधन, प्रचार, अनुभवविश्वाची समृद्धी, स्व-रुपनिष्ठा, आत्मबल अशी काही प्रयोजने सांगितली जातात. साहित्याच्या संदर्भात कलावादी आणि जीवनवादी अशाही दोन भूमिका मांडल्या जातात. साहित्याच्या संदर्भातील वरील प्रयोजनांचा विचार करता साहित्य आणि समाज यांच्यातील दृढ नाते स्पष्ट होते. त्यामुळे समाजाच्या शाश्वत विकासात साहित्याचे स्थान नेमके काय असते याचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते. यादवकाळापासून आजपर्यंतच्या उपलब्ध असलेल्या संत, पंत, तंत आणि आधुनिक साहित्यप्रकारातील काही



ARTS, SCI.& COMMERCE COLLEGE IQAC NAAC MANMAD